# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-४२/२०२५ दिनांक- २७/०१/२०२५

## प्रेस नोट

### "पत्नीचा निर्घुन खुन करुन पसार झालेल्या आरोपीस १५ वर्षा नंतर उन्नाव, उत्तर प्रदेश येथुन अटक करण्यात मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश"

नालासोपारा पुर्व येथील संतोष भवन परिसरातील तुळशीनगर, बावशेत पाडा, कारगील टेकडी येथील व्दारका चाळ येथे राहणारी महिला नामे रिहाना वय-३५ वर्षे हि तेचे दुसरा नवरा जवाद जब्बार सय्यद याचे सोबत तीचे पहिल्या नवरा अन्वर खान याचे पासुन झालेल्या एक मुलगा व दोन मुलीसह सदर ठिकाणी राहण्यास होती. परंतु तीचा मोठा मुलगा महंमद हरुल अन्वर खान हा गाळा नगर, नालासोपारा येथे जरीचे कारखान्यात काम करुन त्याच ठिकाणी मित्रांसह राहत होता. तो अधुन मधुन त्याचे आईस व भावंडाना भेटणे करीता वरील पत्यावर जात येत असल्याने त्याचे सावत्र वडील जवाद जब्बार सय्यद यास राग येत होता या कारणावरुन पती-पत्नी मध्ये वाद होत होते.

दिनांक २२/०५/२०११ रोजी महंमद हारुन खान हा त्याचे आई रिहाना व भावंडासोबत घरी मुक्काम केल्याच्या कारणावरुन दिनांक २४/०५/२०११ रोजी ००.३० वा. सुमारास रिहाना व आरोपी पती जवाद जब्बार सय्यद यांचेत वाद होवून त्याने पत्नी झोपेत असतांना तीचे डोक्यात मोठा दगड घालुन तीस जीवे ठार मारले म्हणून मुलगा महंमद हारुन अन्वर खान याने दिलेल्या फिर्यादी वरुन नालासोपारा पोलीस ठाणे गुरनं । २७१/२०११, भादंविसंक ३०२ प्रमाणे दिनांक २४/०५/२०११ रोजी खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाले पासुन आरोपी जवाद जब्बार सय्यद हा पसार झाला होतो.

मा.पोलीस उपआयुक्त (गुन्हे) व मा.सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) यांनी गंभीर व संवेदनशील अशा आज पावेतो उघडकीस न आलेले खुनाचे गुन्हे उघकीस आणने बाबत आदेश केले होते. त्याप्रमाणे वरील गुन्हा अतिशय गंभीर स्वरुपाचा असल्याने तसेच नमुद गुन्हयातील आरोपी यांचा यापुर्वी सर्वोतोपरी शोध घेऊन देखील तो गेल्या १५ वर्षा पासुन मिळुन येत नव्हता. त्याअनुषंगाने मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक अविराज कुराडे यांनी सपोनिरी.दत्तात्रय सरक, सहा.फौज/आसिफ मुल्ला, पोहवा/संग्राम गायकवाड, महेश वेल्हे, शिवाजी पाटील, गोविंद केंन्द्र, हनुमंत सुर्यवंशी असे तपास पथक तयार केले होते.

सदर पथकाने गुन्हयाची नालासोपारा पोलीस ठाणे येथुन माहिती घेवुन नमुद पोलीस पथकाने गेले ०१ महीन्या पासुन सतत अहोरात्र मेहनत घेवुन तपासात सातत्य ठेवून नालासोपारा भागातुन नमुद आरोपीताची माहीती घेतली असता आरोपी नामे जवाद जब्बार सय्यद हा त्याचे मुळ गांवी उन्नाव, लखनऊ उत्तरप्रदेश येथे आपले अस्तीत्व लपवुन राहत असल्याची माहीती मिळुन आली. लागलीच वरील पोलीस पथकाने आरोपीचे मुळ गावी जावुन गुप्तबातमीदार व आरोपीचे मोबाईल फोनचे तांत्रीक विष्लेषणावरुन नमद आरोपी हा त्याचे वरील मळ गांवी राहत असल्याची माहिती प्राप्त झाल्याने स्पेशल टास्क फोर्स.

लखनऊ यांचे मदतीने सापळा लावुन आरोपी नामे जवाद जब्बार सय्यद वय-३१, रा.ग्राम नोहाई खुर्द, पोस्ट हैदराबाद, ठाणा. आसिवन, जि.उन्नाव, उत्तरप्रदेश येथुन दिनांक २५/०१/२०२५ रोजी शिताफिने ताब्यात घेण्यात आलेले आहे. त्यास अपर मुख्य न्यायदंडाधिकारी, लखनऊ यांचे न्यायालयात हजर करुन त्याची दिनांक २८/१/२०२५ पावेतो ट्रान्झीट रिमांड घेण्यात आलेली आहे.

अशा प्रकारे पत्नीच्या डोक्यात मोठा दगड घालुन ठार मारुन गेले १५ वर्षापासून फरार असणाऱ्या आरोपीस पकडुन सदरचा गुन्हा उघडकीस आणण्यास मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश आले आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री. अविनाश अंबुरे व मा. सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. मदन बल्लाळ यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पो.निरी. अविराज कुराडे, सपोनिरी.दत्तात्रय सरक, नितीन बेंद्रे, सहापोउपनिरी. श्रीमंत जेधे, मनोहर तावरे, आसीफ मुल्ला, पोहवा.शिवाजी पाटील, महेश वेल्हे, हनुमंत सुर्यवंशी, राजाराम काळे, संतोष मदने, संग्रामसिंग गायकवाड, प्रविणराज पवार, गोविंद केंद्रे, पोशि. नितीन राठोड, अंगद मुळे, आकील सुतार, मसुब सचिन चौधरी, सफौ.संतोष चव्हाण सर्व नेमणुक मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखा यांनी यशस्वी कामगिरी केलेली आहे.




------ooooo-----

THE FREE PRESS JOURNAL SINCE 1928



# Mira Bhayandar: Central Crime Unit Of MBVV Police Arrest 50-Year-Old Man Who Stoned Wife To Death In H...

Available on the App Store

ANDROID APP ON Google play